*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# भारत, कोरोना वायरस आणि पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवन तत्वाची उपयुक्तता

प्रा. सचिन ताराचंद धुर्वे

सहायक प्राध्यापक , यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

……………………………………………………………………………………………………

**गोषवारा -**

वर्तमान काळात संपूर्ण जग एका मोठ्या संकटातून जात आहे. कोरोना वायरस ने संपूर्ण जगात थैमान माजविले आहे. जगात दिवसगणिक कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या वाढत चाललेली आहे. आज कोणताही देश कोरोना वायरसच्या प्रकोपापासून वाचू शकला नाही. आज अमेरिका सारखी महासत्ता सुद्धा कोविड-१९ च्या जाळयात अडकलेला आहे. चीन या देशातून उगम पावलेल्या कोरोना वायरस बघता बघता संपूर्ण जगाला व्यापून टाकले आहे. आज जगातील महासत्तांमध्ये शाब्दिक युद्ध सुरु झाले आहे. अमेरिका आणि चीन हि दोन्ही राष्ट्र परस्परांवर आरोप प्रत्यारोप करत आहे. जगाला भीती आहे कि एक प्रकारे जैविक युद्ध तर सुरु नाही. अशा परिस्थितीत भारताने सर्व राष्ट्रांना कोरोना वायरस वर मात करण्यासाठी आवश्यक मेडीसीन पुरवून जगा आणि जगू द्या या तत्वाचा अंगीकार केलेला आहे. अशा अशांतातामय परिस्थितीत पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवन तत्वाचे महत्व संपूर्ण जगाला पटू लागले आहे. जेव्हा जेव्हा जगामध्ये अशांतता निर्माण झाली तेव्हा तेव्हा जगाने पंडित नेहरूंच्या शांतातमय सहजीवनाचे तत्वाचा स्वीकार केलेला आहे. आजच्या कठीण परिस्थितीत जगाने संयम ठेवून पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवन तत्वाचा स्वीकार करावा असे म्हणावे लागेल.

**प्रस्तावना-**

प्राचीन काळापासून भारताने जगाला शांततेचा संदेश दिला आहे. 'वसुधैव कुटुम्बकम' हि भारतीय संस्कृतीचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. भारताने संपूर्ण जग हे आपले कुटुंब आहे याची प्रचिती वारंवार दिली आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा जगावर कोणते संकट आले तेव्हा तेव्हा भारताने जगाला मदत केली. भारताचे पहिले पंतप्रधान श्री पंडित नेहरू यांनी आपल्या परराष्ट्र धोरणाद्वारे जगाला शांततेचा संदेश दिला आहे. नेहरूंचे संपूर्ण राजकीय विचार शांततेच्या तत्वावर आधारित होते. पं. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला दिलेली महत्वपूर्ण देणगी म्हणजे नेहरूंचे पंचशील तत्वे . पंचशील म्हणजे पाच शील (तत्वे). बौध्द धर्मातील एक संकल्पना शील म्हणजे सदवर्तन, सदविचार. परंतु हि एक धार्मिक संकल्पना होती. बौध्द धर्मातील या धार्मिक संकल्पनेला राजकीय स्वरूप प्राप्त करून देण्याची किमया पंडित नेहरूंनी केली. आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिक शांततेसाठी शांततामय सहजीवन संकल्पनेचा प्रयोग पं. नेहरूंनी केला.

**पंचशील तत्व-**

पंडित नेहरूंची पंचशील तत्वे म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध राष्ट्रांनी करावयाचे सद्वर्तन होय. जगातील सर्व राष्ट्रांनी पंचशील तत्वांचा स्वीकार करून जागतिक शांतता व सुव्यवथा निर्माण करण्याचे एक धोरण आहे. आजच्या कठीण प्रसंगी सर्व राष्ट्रांनी पंचशील तत्वांचा अवलंब करायला पाहिजे. पं. नेहरूंच्या मते, पंचशील तत्वे एक जीवनशैली आहे. ज्याद्वारे सर्व राष्ट्र शांततेचा पुरस्कार करतात. जागतिक शांततेसाठी १९५४ मध्ये पंचशील तत्वांचा पुरस्कार पंडित नेहरूंनी केला. १९५४ मध्ये भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू आणि चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय यांच्या दरम्यान तिबेट प्रश्नावरून करार झाला. या करारामध्ये पुढील पाच धोरणांचा स्वीकार करण्यात आला. यालाच पंचशील तत्वे असे म्हणतात.

1- भौगोलिक अखंडता व सार्वभौमत्व यांचा सन्मान करणे
2- युध्द न करणे
3- इतर राष्ट्रांच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप न करणे
4- सर्व राष्ट्रांना स्वातंत्र्य व स्वायत्तता
5- शांतातमय सहजीवन

वरील पाचही तत्वे आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवीन कलाटणी देणारे ठरले. त्यामुळे जगातील सर्व राष्ट्रांनी पंचशील तत्वाचा स्वीकार केलेला दिसून येतो.

**शांतातमय सहजीवनाचे तत्व-**

पंडित नेहरूंनी सांगितलेले पाचही तत्वे आंतरराष्ट्रीय जगतामध्ये शांतता निर्माण करण्यसाठी महत्वाची भूमिका बजावतात. परंतु या सर्व मध्ये आज सर्वात जास्त गरज आहे ती म्हणजे शांततामय सह्जीवनाची. शांततामय सहजीवन याचा

अर्थ जगा आणि जगू द्या असा होतो. शांततामय सहजीवनाचा अर्थ व्यापक आहे. जगातील प्रत्येक धर्माने शांततेचा संदेश दिलेला आहे.मोठ-मोठ्या महापुरुषांनी जगात शांतता नांदावी यासाठी जगात शांततेचा प्रसार केला. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा जगात दोन महासत्ता उदयास आली तेव्हा जगात शीतयुद्ध सुरु झाले. याच काळात अनेक देश स्वतंत्र झाले तर काही राष्ट्रे उदयास आले. भारत हा देश स्वतंत्र झाला. तेव्हा भारत कोणत्या गटात सहभागी होणार याकडे जगाचे लक्ष होते. तेव्हा भारत कोणत्याही महासत्तेच्या गटात सामील न होता आपले स्वतंत्र अस्तित्व जोपासनार अशी नेहरूंनी भूमिका स्वीकारली आणि जगात शांततेसाठी भारत प्रयत्न करेल असे परराष्ट्र धोरण स्वीकारले. शीतयुध्द म्हणजे एक वैचारिक युद्ध होते. परंतु या वैचारिक युद्धाचे केव्हाही वास्तविक युद्धात रुपांतर होवू शकते याची सर्वांना भीती होती. पंडित नेहरूंनी भविष्यकालीन युद्धाचे संकट टाळण्यासाठी शांततामय सहजीवन तत्वाचा स्वीकार केला होता.

**कोरोना वायरस आणि जग-**

आजच्या काळात सध्यस्थितीत जगात कोरोना वायरसमुळे अराजकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चीन मधून उगम पावलेला कोविड-१९ वायरस अल्पावधीत संपूर्ण जगात पसरला गेला. जगातील जवळपास २०० देशामध्ये कोरोना वायरस ने शिरकाव केला आहे. कोरोना वायरसमुळे जगात २ लाखापेक्षा जास्त लोकांचा बळी गेला आहे. आज अमेरिकासारख्या महासत्ता असणाऱ्या देशात कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव दिसत आहे. जगातील सर्व विकसित राष्ट्रामध्ये कोरोणाचा प्रभाव जास्त दिसत आहे. त्यामुळे अमेरिका आणि चीन या दोन देशामध्ये शाब्दिक वाद सुरु झाले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी चीनने कोविड-१९ विषाणूची निर्मिती केली याबाबत चीनविरुध्द आपल्याकडे ठोस पुरावे आहेत असे म्हटले आहे. त्यामुळे कोरोना म्हणजे एक जैविक युद्ध तर नाही ना अशी भीती सर्वसामान्य लोकांच्या मनात निर्माण होत आहे. आज जगातील सर्व राष्ट्र चीन या देशाविरुध्द नवीन धोरण तयार करत आहे. अनेक राष्ट्र चीनवर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत आहेत. अनेक राष्ट्रांनी चीनमधील आपले उद्योग दुसऱ्या देशात वळविण्याचे धोरण ठरविले आहे त्यामुळे आज जागतिक अर्थकारणात आमुलाग्र बदल घडून येताना दिसते. तर एकीकडे अमेरिका आणि जगातील इतर देशामध्ये आर्थिक मंदी चे सावट आहे तर चीनने संपूर्ण बाजारपेठेवर आपला दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. परिणामस्वरूप भविष्यकाळात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होवू शकते. अशावेळेस जर युध्द झाले तर संपूर्ण मानवसृष्टी धोक्यात येवू शकते. त्यामुळे आज जगाला पंडित नेहरूंच्या शांततामय सहजीवन तत्वाची गरज आहे.

**कोरोना वायरस, जग आणि भारताच शांततामय सहजीवनाच धोरण-**

पंडित नेहरूंच्या शांततामय सहजीवन तत्वाचा अर्थ '**जगा आणि जगू द्या**' असा होतो. भारताने आज कोरोना वायरस मुळे निर्माण झालेल्या कठीण प्रसंगी सुध्दा आपले शांततामय सहजीवनाचे धोरणात बदल केलेला नाही. जेव्हा अमेरिका आणि इतर राष्ट्र चीन विरुध्द कार्यवाहीची भाषा बोलत आहे तेव्हा भारत मात्र जगातील सर्व राष्ट्रांना कोरोना वायरस वरील प्रभावी औषध पाठवून जगा आणि जगू द्या चा संदेश देत आहे. आज भारत कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सामना करताना इतर राष्ट्रांना मदतीचा हाथ देत आहे. आज जगातील काही मागासलेल्या देशामध्ये कोरोना वायरसशी सामना करण्याचे सामर्थ्य नाही. अशा राष्ट्रांना आर्थिक मदत करून त्यांना या वायरस शी लढा देण्यासाठी आवशक असणारे साहित्य पुरविण्याचा प्रयत्न भारत करत आहे. खरच पंडित नेहरूंच्या जगा आणि जगू द्या या धोरणाचा अवलंब भारत सरकार करत आहे. असे आपल्याला म्हणता येईल . आज अमेरिका सारखा बलाढ्य देश भारताने पुरविलेल्या मेडिकल मदतीबद्दल आभार मानीत आहे.

**जगाला मानवतच्या संदश दणार तत्व-**

कोरोना वायरसमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सर्वच राष्ट्रांनी मानवतेचा संदेश देणारे महत्वाचे तत्व म्हणजे शांततामय सहजीवनाचे तत्व आहे. आजच्या संकटग्रस्त परिस्थितीत सर्वच राष्ट्रांनी या तत्वाच्या स्वीकार करायला हवा. कारण भविष्य फार कठीण आहे. आज जगातील सर्वच राष्ट्र आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेले आहे. अशात जर सर्व राष्ट्रांनी एकमेकांना मदत केली नाही तर अनेक राष्ट्रे आपल्या विकासाच्या ३० वर्ष पाठीमागे गेलेली दिसून येतील. जगाला या सर्वातून वाचवायचं असेल तर पंडित नेहरूंच्या जगा आणि जगू द्या तत्वाचा अंगीकार जगातील सर्व राष्ट्रांनी करणे आवश्यक आहे. आज स्वार्थी वृतीने केवळ आपल्या देशाचा विकास करून चालणार नाही. जागतिक आर्थिक घडी बसवायची असेल तर सर्वच राष्ट्रांना सोबत घेवून सर्वांगीण आर्थिक विकास साधने आवश्यक आहे त्यासाठी पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवनाचे तत्व उपयोगी पडेल असे आपल्याला म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

1. कोरोना वायरस मुळे संपूर्ण जगात अराजकता निर्माण झाली आहे.
2. कोरोना वायरसने संपूर्ण जग व्यापून टाकले आहे.
3. चीनमधून उगम झालेल्या कोरोना वायरसमुळे अमेरिकासारख्या बड्या राष्ट्रांनी युद्धाची भाषा बोलायला सुरवात केली आहे.
4. अशा संकट काळात भारताने मात्र संयमाची भूमिका स्वीकारली आहे.
5. पंडित नेहरूंच्या जगा आणि जगू द्या तत्वाचा स्वीकार करून भारताने कोरोना वायरसवरील प्रभावी औषध इतर राष्ट्रांना पुरविण्याचे धोरण स्वीकारले आहे.
6. कोरोना वायरसमुळे जागतिक स्तरावर आर्थिक महामंदी निर्माण झाली आहे.
7. जागतिक आर्थिक महामंदीचा सामना करण्यासाठी सर्व राष्ट्रांनी नेहरूंच्या जगा आणि जगू द्या तत्वाच्या अवलंब करून इतर मागासलेल्या राष्ट्रांना मदत करायला पाहिजे.
8. कोरोनामुळे निर्माण झालेल्या जागतिक परिस्थितीत जगाला वाचविण्यासाठी पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवन तत्व महत्वाची भूमिका बजावू शकते.

आज संपूर्ण जग कोरोना वायरसमुळे फार मोठ्या संकटातून जात आहे. कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलेले आहे. जगातील महत्वाची आर्थिक केंद्रे बदलली आहे. त्यामुळे सर्व महासत्तांची आर्थिक परिस्थिती डबघाईस आलेली आहे. अशा परीस्थित सर्वच राष्ट्रांनी उदारतेचे धोरण स्वीकारून 'वसुधैव कुटुम्बकम' या उक्तीप्रमाणे सर्व राष्ट्रांना सोबत घेवून जागतिक विकास साध्य करायला पाहिजे. यासाठी पंडित नेहरूंचे पंचशील तत्वे उपयोगाचे ठरतील. जगा आणि जगू द्या या धोरणाचा स्वीकार करून सर्वच राष्ट्रांचा शास्वत विकास साध्य करता येते. त्यामुळे पंडित नेहरूंचे शांततेचे धोरण नेहमीच सर्व राष्ट्रांना प्रेरणादायी ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची-**

1. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, 'भारतीय परराष्ट्र धोरण – सातत्ये आणि स्थित्यंतर', प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७
2. वी.एन.खन्ना, ' भारत कि विदेश नीती', विकास पब्लिकेशन हाऊस, न्यू दिल्ली, २००९
3. अरविंद ताटके, 'पंडित जवाहरलाल नेहरू', सरिता प्रकाशन, पुणे १९९०
4. डॉ. वि. मा. बाचल, 'भारताचे परराष्ट्र धोरण', कॉटिनेटल प्रकाशन, विजयनगर ,पुणे,१९७८
5. चेतना प्रकाश शर्मा, 'भारत के प्रधानमंत्री', मनोज पब्लिकेशन, दिल्ली,२००७
6. डॉ. वसंत रायपूरकर, आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन, नागपूर
7. प्रा. बी. डी. तोडकर, 'आंतरराष्ट्रीय राजकारण', प्रशांत पब्लिकेशन, जलगाव